

Sunday Morning

सुराज्य सोलापूर ८

रविवार, दि.२७ नोव्हेंबर २०२२


# मराठी VS कन्नड

## सोलापूर, अक्कलकोट नम्मदे : कर्नाटक

## बेळगाव, निपाणी आमचेच : महाराष्ट्र









भाषावार प्रांतरचनेचा जो मुद्दा पुढे करून कर्नाटकातील बेळगाव, कारवार, निपाणी आदी मराठी बहुभाषिक पट्ट्याची मागणी महाराष्ट्र राज्याकडून केली जाते; त्याच मुद्यावरून महाराष्ट्रातील सोलापूर शहरासह दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट हा कन्नड बहुभाषिक भाग कर्नाटकाला हवा आहे. महाराष्ट्र हा भाग सोडायला तयार नाही आणि कर्नाटक त्यांचा भाग महाराष्ट्राला द्यायला तयार नाही. फरक एवढाच आहे की बेळगाव परिसरातील मराठी भाषिक लोक कर्नाटकात राहण्यास तयार नाहीत आणि महाराष्ट्रातील कन्नड भाषिक लोक सोलापूर सोडण्यास तयार नाहीत. दोन्हीकडे तत्त्व एकच असले तरी लोकभावना आणि लोकइच्छा वेगवेगळी आहे. महाराष्ट्र लोकइच्छा प्रमाण मानून आपल्याकडील कन्नड भाषिक पट्टा कर्नाटकाला जोडण्यास पूर्वीपासून विरोध करत आहे. मात्र बेळगाव परिसरातील लोकांची महाराष्ट्रात जाण्याची इच्छा असूनही कर्नाटक सरकार लोकभावनेला भीक घालत नाही. त्यावरून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न निर्माण झाला आहे. अनेक आंदोलने झाली. अनेकांचा बळी गेला. अनेकांनी तुरुंगवास भोगला, तरीही तोडगा काही निघेना. शेवटी सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली तरीसुद्धा निर्णय काही लागेना. त्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचे घोंगडे भिजत राहिले आहे. हाच सीमा प्रश्न 'सुराज्य'च्या वाचकांना समजावून सांगण्याचा हा प्रयत्न.

सध्याचे कर्नाटक राज्य म्हणजे पूर्वीचे म्हैसूर राज्य. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४८ साली अस्तित्वात आलेले भारतातील पहिले राज्य म्हणजे म्हैसूर. दि. १ नोव्हेंबर १९७३ साली म्हैसूरचे नाव बदलून कर्नाटक करण्यात आले. त्यामुळे कर्नाटक राज्याचा स्थापना दिवस हा १ नोव्हेंबर आहे. त्याआधी १९५६ साली तत्कालीन म्हैसूर राज्याच्या सीमा वाढवण्यासाठी विजापूर, धारवाड, गुलबर्गा, बीदर यासह बेळगाव जिल्हा म्हैसूर राज्यात समाविष्ट करण्यात आला. यावेळी भाषावार प्रांतरचना लक्षात न घेता प्रशासकीय कामांमध्ये बदल घडवण्यासाठी कायदा मंजूर करत बेळगावचा समावेश म्हैसूर राज्यात करण्यात आला. त्यामध्ये कारवार, निपाणी ,बिदर, बेळगाव या शहरासह ८६५ खेड्यांचा समावेश या राज्यात करण्यात आला. याठिकाणी मराठी भाषिक बहुसंख्य आहेत. सीमाभागात या निर्णयाला तीव्र विरोध झाला. तेव्हापासून मराठी भाषिक जनतेचा सीमाप्रश्नाचा हा लढा सुरू आहे.

पूर्वी बेळगांव हे तात्कालीन बॉम्बे ह्या राज्यात होते. पण कर्नाटक राज्याच्या निर्मितीवेळी लोकमताचा आदर न करता कर्नाटकात विलीनीकरण करण्यात आले. त्या घटनेमुळे बेळगावात संतापाची लाट उसळली, मोठ्या प्रमाणात आंदोलने झाली.अनेकजण गोळीबारात ठार झाले. तेव्हापासून बेळगावची जनता महाराष्ट्रात जाण्यासाठी लोकशाही मार्गाने लढा देत आहे.

## महाजन आयोग



दि. २२ मे १९६६ रोजी सेनापती बापट आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्यमंत्री निवासस्थानाबाहेर आमरण उपोषण सुरू केले. त्यामुळे महाराष्ट्रातील वातावरण तापले होते. नाथ पै यांनी सीमावादाचा हा प्रश्न इंदिरा गांधींपर्यंत पोहचवला. बापट यांच्या उपोषण आंदोलनाची दखल घेत तत्कालीन केंद्र सरकारने दि. २५ ऑगस्ट १९६६ रोजी माजी न्यायमूर्ती मेहेरचंद महाजन यांच्या एकसदस्यीय आयोगाची नेमणूक केली. दि. २५ ऑगस्ट१९६७ रोजी महाजन आयोगाचा अहवाल आला. त्यानुसार प्रशासनाच्या सोयीसाठी बेळगाव कर्नाटकमध्ये ठेवणे उचित असेल असा अहवाल दिला. त्यावर सीमाभागात तीव्र संतापाची लाट उसळली. ती आजवर धगधगत आहे. १९७३ पासून १ नोव्हेंबर हा कर्नाटकाचा स्थापना दिन सीमाभागात काळा दिन म्हणून साजरा केला जातो.

## महाजन आयोगाने सोलापूरविषयी केलेली शिफारस

**सोलापूर शहर व जिल्ह्याच्या बाबतीत महाजन अहवालाचा निर्णय वादग्रस्त ठरला. महाजन अहवालाने सोलापूर जिल्ह्यातील जे विभाग म्हैसूर राज्यात घालण्याची शिफारस केलेली होती; त्यावरून जनतेत असंतोष निर्माण झाला.**

१) महाजन अहवालाने अक्कलकोट तालुका म्हैसूरमध्ये समाविष्ट करण्याची शिफारस केली. निर्णय देताना म्हटले की संपूर्ण तालुक्यात ५५.५ टक्के कन्नड भाषिक लोकसंख्या असून मराठी भाषिक जनता २३.३ टक्केच आहे. स्वातंत्र्यापूर्वी अक्कलकोट हे स्वायत्त संस्थान असल्याने तो संपूर्ण विभाग स्वायत्त समजून त्याचा समावेश म्हैसूर राज्यात करावा.

२) महाराष्ट्राने १९६१ च्या खानेसुमारीच्या अनुषंगाने दक्षिण सोलापूर तालुक्यातील ६५ गावांपैकी कंदलगाव, कुसूर, खानापूर, तेलगांव, मंद्रूप व भंडारकवठे या ६ गावांची लोकसंख्या १९६१ मध्ये १९५१ च्या तुलनेने मोठ्या प्रमाणात मराठी भाषिक लोकसंख्येने वाढलेली होती. महाजन आयोगाने स्वतः:च १९६१ च्या खानेसुमारीची कसोटी लक्षात घ्यावी ही केलेली सूचना डावलून ही सर्व गावे म्हैसूर राज्यातच समाविष्ट करण्याची अशी शिफारस केली. ही लोकसंख्येची वाढ अगदी किरकोळ स्वरूपाची आहे असे मत देऊन हा निर्णय दिला.

३) महाजन आयोगाने सीमावाद सोडविण्यासाठी सलग पट्ट्याचे तत्त्व देखील मांडलेले होते. महाजन यांच्या मते ज्या भागात सलग एक भाषा बोलणाऱ्यांचे बहुमत आहे आणि ज्या भागाची लोकसंख्या २०,००० पर्यंत आहे, तो सलग पट्टा मानून त्या भागाचा समावेश संबंधित भाषिक राज्यात करावा. ही सूचना महाजन अहवालात केलेली होती. परंतु या तत्त्वाचा महाजन अहवालात न्या. महाजन यांनी स्वतः च भंग केला. मोहोळ तालुक्यातील काही गावात ६० टक्के पेक्षा जास्त मराठी भाषिक लोक होते. आणि ही गांवे दक्षिण तालुका व मोहोळच्या सलग मराठी पट्ट्यातच होती. असे असताना ही गावे कर्नाटकात घालण्याची शिफारस केली. साहजिकच त्यामुळे महाजन अहवालासंबंधी असंतोष निर्माण झाला.

४) तसेच महाराष्ट्र सरकारने दक्षिण तालुक्यातील वळसंग परिसरातील गावांत १९६१ च्या खानेसुमारीनंतर मराठी भाषिक लोकसंख्येत वाढ झाल्याने ती गांवे म्हैसूरला देण्यास नकार दिलेला होता. तेथे १९६१ च्या खानेसुमारीनुसार ६२ टक्के पेक्षा जास्त मराठी भाषिक लोकांची संख्या होती. परंतु महाजन अहवालाने महाराष्ट्राच्या या मागणीला देखील विरोध दर्शवून वास्तविक ही गांवे सलग मराठी पट्ट्यात असताना देखील म्हैसूर राज्यात घालण्याची शिफारस केली. परिणामी या भागातील जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला.

५) सोलापूर शहर मात्र महाजन आयोगाने महाराष्ट्रातच ठेवण्याची शिफारस केली होती.

## याचिका



१९८३ मध्ये बेळगाव महापालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत मराठी भाषिकांनी सत्ता स्थापन केली. या महापालिकेसह सुमारे २५० गावांनी कर्नाटक सरकारला प्रस्ताव पाठवून महाराष्ट्रात जाण्याची इच्छा व्यक्त केली. पुढे सन २००५ मध्ये बेळगाव महापालिकेने महाराष्ट्रात सहभागी होण्यासंदर्भात ठराव केल्याने कर्नाटक राज्य सरकारने महापालिका बरखास्त केली. त्यावेळी महाराष्ट्रात काँग्रेस आघाडीचे सरकार होते. विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते. महाराष्ट्राने २९ मार्च २००५ रोजी सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नावर दावा दाखल केला. त्यावर २००६ साली पहिली सुनावणी झाली. तेव्हापासून धिम्या गतीने ही न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. या प्रश्नावर अद्याप तोडगा निघालेला नाही. महाराष्ट्र सरकारतर्फे हरिश साळवे, राजू रामचंद्रन, अरविंद दातार, राकेश द्विवेदी असे विधिज्ञ सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यासाठी आहेत.

## कर्नाटकाचा केंद्राकडे अर्ज




हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना कर्नाटक सरकारने काही वर्षापूर्वी सर्वोच्च न्यायालयात एक अर्ज दाखल केला आहे. त्यानुसार राज्य कमी करणे, सीमा वाढवणे, नावात बदल करणे असे अधिकार हे संसदेला असतात. त्यामुळे हा प्रश्न सोडवण्याचा अधिकार न्यायालयाला नाही. त्यामुळे हा प्रश्न केंद्र सरकारने सोडवावा, असे या अर्जात नमूद करण्यात आले आहे.यावर अद्याप सुनावणी झालेली नाही.



## कर्नाटकाच्या कुरापती

- दरम्यानच्या काळात या भागात कर्नाटक सरकारने बेळगांवचे नाव 'बेळगावी' असे केले.
- बेळगावमध्ये कर्नाटकची दुसरी विधानसभा बांधून तिथे दरवर्षी अधिवेशन भरवण्याचा निर्णय घेतला.
- कर्नाटक सरकारची काही कार्यालयेही इथे सुरू केली गेली.
- इथे आता मराठी भाषिकांपेक्षा कन्नड भाषिकांची संख्या जास्त असल्याचा दावाही या राज्याकडून केला जातो आहे.
- बेळगावला उपराजधानीचा दर्जा दिला
- सीमावर्ती भागातील मराठी गावांना सोई-सुविधा देण्याचा कर्नाटकाचा प्रयत्न

## सोलापूरवर कर्नाटकाचा दावा कशासाठी?




सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर या दोन तालुक्यांसह खुद्द सोलापूर शहरात कन्नड भाषिकांचे प्राबल्य आहे. या भागात जसे मराठी परंपरेचे सण-उत्सव साजरे केले जातात; तसे कन्नड परंपरेचेही साजरे केले जातात. भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा पुढे करून जसे महाराष्ट्र कर्नाटकातील बेळगाव, कारवार, निपाणीचा परिसर मागते, त्याच मुद्द्यावरून कर्नाटक राज्य सोलापूर शहरासह अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यांचा परिसरावर हक्क सांगत आहे. हाच संदर्भ घेऊन कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी जत तालुक्यातील ४० गावांसह सोलापूर शहर, अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यावर कर्नाटकाचा हक्क असल्याचा दावा केला आहे.

## छगन भुजबळ बनले इक्बाल शेख....

सन १९८६ साली अगदी चित्रपटातील एखादा प्रसंग वाटावा असे नाट्य घडवून आणले. मराठी भाषिकांचा आवाज दाबवण्यासाठी बेळगाव, कारवार भागात कर्नाटक सरकारने कन्नड भाषेची सक्ती केली होती. त्याविरोधात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. बेळगावात जावून आंदोलन करण्याचा निर्णय बाळासाहेबांनी घेतला होता.



तेव्हा शिवसेनेचे आक्रमक नेते असलेल्या छगन भुजबळ यांनी शिवसेनाप्रमुखांचा तो आदेश प्रत्यक्षात आणला. तो दिवस होता ४ जून १९८६. महाराष्ट्रातून कर्नाटकात येण्याचे सर्व रस्ते बंद करण्यात आले होते. छगन भुजबळ यांनी दुबईचे व्यापारी इक्बाल शेख यांची वेशभूषा केली. मुंबईहून एक ॲम्बासेडर कार घेऊन ते गोव्याहून बेळगावात मध्यरात्रीच्या सुमारास दाखल झाले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांनी कर्नाटक सरकारच्या विरोधात गनिमी काव्याने शिवसेनेचे आंदोलन केले. या आंदोलनानंतर कर्नाटक पोलिसही चक्रावले. भुजबळ बेळगावात आलेच कसे? हे त्यांना कळलेच नाही. त्यांनी भुजबळ व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक धारवाड कारागृहात ठेवले. दोन महिन्यांनी सुटका झाल्यावर ते मुंबईत परतले. तेव्हा शिवसेनाप्रमुखांनी त्यांच्या पाठीवर थाप देत कौतुक केले.

## काय आहे जत तालुक्यातील प्रकरण?




सांगलीच्या जत तालुक्यातील ६५ गावांनी पाण्याच्या प्रश्नावरून सन २०१३-१४ साली मोठे आंदोलन उभे केले होते. मुंबईपर्यंत पद यात्रा काढली होती. त्यानंतर ४२ गावच्या ग्रामस्थांनी जत ते सांगली अशी दीडशे किलोमीटरची पायी दिंडी देखील काढली. 'पाणी द्यायचे नसेल तर, आम्हाला कर्नाटकात जाण्यासाठी परवानगी द्या', अशी भूमिका घेत नागरिकांनी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. अनेक गावातील ग्रामपंचायतीमध्ये कर्नाटक राज्यात जाण्याचे ठरावही करण्यात आले होते.

## सोलापूरकरांना वाटते....कर्नाटकात समावेश का करू नये?

- दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्याच्या सीमेवरून भीमा नदी वाहते. नदीपलीकडे कर्नाटक राज्य आहे. नदी भरून वाहत असतानाही नदीतील घागरभर पाणीसुद्धा घेण्याचा अधिकार दक्षिण आणि अक्कलकोट तालुक्याला नाही. कारण त्या काळात नदीकाठचा वीजपुरवठा खंडीत केला जातो. उलट कर्नाटकातील शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी वीज मोफत दिली जाते. त्यामुळे नदीपलीकडे अखंडपणे पाणी उपसा सुरू असतो.
- वर्षभर पोटच्या गोळ्याप्रमाणे वाढवलेला ऊस आमचा महाराष्ट्रातील कारखानदार कमी दराने घेतात. दरासाठीसुद्धा शेतकऱ्यांना आंदोलन करावे लागते. मात्र कर्नाटकातील कारखाने महाराष्ट्रापेक्षा जादा दर देतात.
- उजनी धरण तुडुंब भरलेले असतानाही सोलापूरला पाच दिवसाला एकदा म्हणजे आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होतो. पाणीपट्टी मात्र वर्षभराची घेतली जाते.
- अक्कलकोट हे सर्वात मोठे तीर्थक्षेत्र असूनही त्याठिकाणी हिवाळ्यातसुद्धा दहा दिवसाला एकदा पाणी मिळते. उन्हाळ्यात तर महिन्यातून एकदाच पाणीपुरवठा होतो.
- सोलापूर स्मार्ट सिटी असूनही शहरातील रस्त्यांवर खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ते आहेत, हेच समजत नाही.
- शहरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाच नाही. एसएमटीच्या बसगाड्या थांबल्या ठिकाणी कुजून गेल्या आहेत.
- सोलापुरात देशातील सर्वात महागडे पेट्रोल-डिझेल मिळते. मात्र भीमा नदीपलीकडे सोलापूरपेक्षा खूपच कमी दरात पेट्रोल- डिझेल मिळते. त्यामुळे सीमावर्ती भागातील सोलापूर जिल्ह्यातील पेट्रोल पंप ओस पडले असून पलीकडे कर्नाटकातील पंपांवर मात्र वाहनांची रांग लागलेली असते.
- सोलापूर राजकीयदृष्ट्यासुद्धा मागासलेले आहे. इथे ११ ते १३ आमदार असूनही जिल्ह्याला स्वत:चा पालकमंत्री मिळत नाही. त्यामुळे विकास खुंटला आहे.
- सोलापूर नंतर गुलबर्गा शहरातून विमानसेवा सुरू झाली असून नजीकच्या भविष्यकाळात विजापुरातूनही विमानसेवा सुरू होत आहे. विमानतळ असूनही सोलापुरातून मात्र विमानसेवा नाही. आता अंतराची अट असल्यामुळे सोलापुरातून विमानसेवा सुरू होण्याचीही शक्यता कमीच आहे.
- सोलापूरला जोडणारे राष्ट्रीय महामार्ग तयार झाले असले तरी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंतर्गत रस्त्यांची वाट लागली आहे. या पार्श्वभूमीवर कर्नाटक सरकार सोलापूरसह अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्याला आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा पुरवणार असेल, तर हा परिसर कर्नाटक राज्यात का समाविष्ट करू नये? असा प्रश्न आता या परिसरातून उपस्थित केला जात आहे.

